# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, शनिवार, दिनांक १७ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२५ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### कमळांचे सरोवर

नुकत्याच झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत राज्यात भाजपचा झंझावत पहायला मिळाला होता. विरोधकांना धोबीपछाड देत भाजपने अनेक ठिकाणी सत्ता काबिज केली आणि जिकडे तिकडे कमळांचे सरोवर फुलविले. या विजयाचे खरे भागीदार केंद्रीयमंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाते. निवडणूक प्रचारात या दोन्ही नेत्यांनी आपल्या सभांमधून विरोधकांवर चिखलफेक न करता विकास कामांवर भर दिला. आम्ही काय केले आणि पुढे काय करणार हे मतदारांना समजावून सांगण्यात दोन्ही नेते यशस्वी झाले. त्याचे फळ की, काय मतदारांनी कमळाला भरघोष मतदान करीत सत्तेच्या चाव्या भाजपच्या हातात दिल्या. एकंदरीत काल मतदान झाले त्यावेळी मतदानाची टक्केवारी लक्षात घेता निकाल अनपेक्षित लागतील असे सर्वांना वाटत होते. टक्केवारी पाहता सर्व पक्षाच्या उमेदवारांमध्ये धाकधुक वाढली होती. मात्र मतमोजणीच्या वेळी सुरुवातीपासूनच भाजपने विजयाची आघाडी घेतली होती. ही आघाडी शेवटपर्यंत त्यांनी कायम ठेवली. त्यामुळेच भाजपला मोठ्या प्रमाणात यश मिळाले आणि भाजपच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना विजयाचा गुलाल उधळता आला. मतमोजणीनंतर शहरात सर्वत्र कमळाचे सरोवर फुलल्याचे दिसून येत आहे.

## शहरात मतमोजणी बंदोबस्त निर्विघ्न पार



निवडणूक मतमोजणी स्थळावर सुरक्षाव्यवस्थेचा आढावा घेताना पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंघल

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १६**

नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या निकालासाठी जवळपास चार हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांच्या चोख बंदो बस्तामुळे शहरात कुठेही अनुचित घटना घडली नाही. तसेच पोलिस आयुक्त सिंघल आणि पोलिस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी स्वतः बंदोबस्ताचे नेतृत्व केल्यामुळे कोणतीही निवडणूक मतमोजनी स्थळावरही कोणतीही गोंधळाची स्थिती निर्माण झाली नाही.

गेल्या चार दिवसांपासून मनपा निवडणुकीसाठी शहरात जवळपास साडेपाच हजार पोलिस अधिकारी आणि अंमलदारांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आज शुक्रवारी सकाळी १० वाजता शहरातील १० झोनमध्ये मतमोजणीला सुरुवात झाली. सकाळीच सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मतमोजणी स्थळावर मोठी गर्दी केली होती. मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर कार्यकर्त्यांची गर्दी वाढायला लागली. त्यामुळे पोलिसांचा बंदोबस्ताचा भार वाढला. त्यामुळे पोलिसांना रस्त्यावरच मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवावा लागला.

## ठाकरे ब्रँडला मुंबईत मोठा झटका; गड हातातून गेला

# विरोधक बोलघेवडे, देवाभाऊ कृतीतून भारी!

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६**

मुंबई महापालिकेच्या निकालामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. राज्यातील २९ महापालिकांसाठी गुरुवारी मतदान झाल्यानंतर आज मतमोजणी पार पडली. बहुतांश ठिकाणी भाजपचे उमेदवार विजयी होताना दिसत आहेत, सर्वाधिक चर्चेत असलेल्या मुंबई महानगरपालिकेतही भाजपने सत्ता मिळवली आहे. मुंबई महानगरपालिकेवर तब्बल २५ वर्षांपासून असलेली ठाकरेंची सत्ता यावेळी हातातून गेली आहे. ठाकरेंशिवाय मुंबईचा महापौर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र येऊन निवडणूक लढवत होते.

मराठी मतांचे एकत्रीकरण होईल आणि त्याचा थेट फायदा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आणि मनसेला होईल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्ष निकालात तसे घडताना दिसत नाही. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येऊनही सत्ता मिळवण्यात अपयशी ठरले आहेत. विशेषतः मुंबईसारख्या शिवसेनेच्या बालेकिल्ल्यात हा पराभव ठाकरेंना मोठा धक्का मानला जात आहे.

दुसरीकडे, भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांनी विकास, पायाभूत सुविधा, स्थिर प्रशासन आणि केंद्र व राज्यातील सत्तेचा फायदा या मुद्द्यांवर प्रचार केला. त्याचा परिणाम मतदारांवर झाल्याचे दिसून येत आहे, शहरी मतदारांनी मोठ्या




प्रमाणावर महायुतीला पाठिंबा दिला आहे. मुंबईतील मध्यमवर्गीय आणि नव्या मतदारांमध्ये भाजपला मिळालेला प्रतिसाद हा या विजयामागचा महत्त्वाचा घटक आहे, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

ठाकरे गटाकडून मात्र निवडणूक प्रक्रियेवर आणि सत्ताधाऱ्यांच्या प्रचारावर टीका केली जात आहे. तरीही, एकूण राजकीय वास्तव पाहता मुंबई महापालिकेतील सत्ताबदल जवळपास निश्चित झाला आहे. राज्याच्या राजकारणात याचे दूरगामी परिणाम दिसून येतील.

मुंबईत महापालिकेची निवडणूक असली तरी मतदार अनेकदा नेता कोण आहे? हा विचार करुनच मतदान करतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा गेल्या काही वर्षांत निर्णय घेणारा, प्रशासन चालवणारा, विकास करणारा आणि नियंत्रण ठेवणारा नेता, अशी तयार झाली आहे. प्रचारातही भाजपने स्थानिक उमेदवारांइतकाच फडणवीसांचा चेहरा पुढे केला. त्यामुळे शहरात स्थिर सरकार स्थिर महापालिका असा मेसेज अधिक पोहोचला.

मुंबईकर घोषणा ऐकून नाही, अनुभवावरून मत देतात हे या निवडणुकीत दिसून आलं आहे. या निवडणुकीत भाजपने भावनिक मुद्द्यांपेक्षा विकास आणि सुविधा या मुद्द्यांवर भर दिला. रस्ते, खड्डे, मेट्रो, वाहतूक कोंडी, पाणी, ड्रेनेज. साफसफाई, आरोग्य सुविधा, पावसाळ्यातील व्यवस्थापन यावर भाजपने जास्त भर दिला. अनेक भागात मतदारांचा कल हा जो काम करेल त्यालाच मत असा दिसला. मुंबईमध्ये लोकांना सुविधा महत्त्वाच्या वाटतात आणि भाजपने त्यावर नेमकं बोट ठेवलं.

मुंबई हे बहुभाषिक शहर आहे. मराठी मतदार महत्त्वाचा आहेच, पण तितकाच मोठा प्रभाव अमराठी मतदारांचाही आहे. उत्तर भारतीय, गुजराती, मारवाडी, दक्षिण भारतीय समुदाय शहराच्या अनेक वॉर्डांमध्ये निर्णायक ठरतो. भाजपने या पद्धतीने संघटनात्मक काम केलं आहे.

स्थानिक संपर्क, लहान- मोठे कार्यक्रम, व्यापारी, नोकरदार वर्गाशी संवाद. सोसायटी लेव्हल नेटवर्किंग यावर काम केले या सगळ्यामुळे अमराठी वॉर्डांमध्ये भाजपची पकड जास्त मजबूत झाली. आणि मुंबई जिंकायची असेल तर या वॉर्डांमध्ये संपर्क ठेवणं गरजेचं आहे, भाजपने नेमके हेच केले.

**उमेदवारांची निवड**

भाजपचा विजय फक्त लीडरशिपमुळे झाला नाही, तर अनेक ठिकाणी योग्य उमेदवारांची निवड केली. मुंबईतील मतदार आता पार्टी कोणती? यासोबतच माणूस कोण आहे? भाजपने अनेक वॉर्डांमध्ये काम करणारे नगरसेवक, ओळखीचे चेहरे, स्थानिक प्रश्नांवर काम करणारे कार्यकर्ते, तरुण आणि महिला उमेदवार, तसेच दुसऱ्या पक्षांचे चांगले उमेदवार फोडले.

जिथे उमेदवार मजबूत, तिथे पक्षाला फायदा झाला. शिवाय काही ठिकाणी विरोधकांनी कमकुवत उमेदवार दिल्याने भाजपचा मार्ग सोपा झाला. भाजपची सर्वात मोठी ताकद म्हणजे यंत्रणा आणि नियोजन. मुंबईसारख्या शहरात निवडणूक जिंकायची असेल तर फक्त सभा घेऊन चालत नाही.

### मुंबईत कुणाकुणाचे नातेवाईक पडले?

- रवींद्र वायकरांची मुलगी दिप्ती वायकर
  पक्ष : शिवसेना
- सदा सरवणकरांचा मुलगा समाधान सरवणकर
  पक्ष : शिवसेना
- राहुल शेवाळेंची भावजय वैशाली शेवाळे
  पक्ष : शिवसेना
- अरुण गवळीची मुलगी योगिता गवळी
  पक्ष : अखिल भारतीय सेना
- नवाब मलिकांचे भाऊ कतान मलिक
  पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस

## उद्धव सेनेचे कुमेरिया सलग पाचव्यांदा विजयी



**नागपूर, दि. १६**

नेहरू नगर झोनच्या प्रभाग २८ मधील ओबीसी संवर्गात भाजपाचे विजय झलके यांनी अ मधून काँग्रेसचे राहुल अभंग यांच्यावर १२०३ मतांनी मात कर विजयी पताका फडकावली.

या प्रभागातील सर्वसाधारण महिला संवर्गात भाजपाच्या निता ठाकरे यांनी प्रभाग २८ च्या क संवर्गातून झोनमधील काँग्रेसच्या रंजना कुडूकर यांचा विक्रमी ८७२३ मतांनी धुव्वा उडवला. निता ठाकरे यांना १८,१४२ मते पडली. तर प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या रंजना कडूकर यांना ९,४१९ मते मिळाली. सर्वसाधरण महिला ब गटातून उद्धव सेनेच्या मंगला गवरे यांनी अटितटीच्या लढतीत भाजपाच्या नंदा येवले यांच्यावर ६४३ मतांनी मात केली. गवरे यांना या निवडणूकीत १३,९५७ मतांचा कौल मिळाला तर नंदा येवले यांना १३,३१४ मते मिळाली.

प्रभागाच्या सर्वसाधरण संवर्गातून उद्धव सेनेचे किशोर कुमेरिया यांनी महापालिकेत सलग पाचव्यांदा विजय संपादन करत आपला दबदबा कायम राखला. कुमेरिया यांना १४,८८१ मते मिळाली तर भाजपाचे किरण दातीर यांना ११,२२० मते मिळाली. कुमेरिया यांनी दातीर यांच्यावर ३६६१ मतांनी मात केली.

# भाजपची एकहाती सत्ता

## भाजप-शिंदेसेना१०२, काँग्रेस ३५, मुस्लिम लिग ४, एमआयएम ६, उबाठा २

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १६**

राज्याची उपराजधानी नागपूर महापालिकेच्या निवडणुकीत भाजपने पुन्हा एकहाती सत्ता मिळवित जोरदार मुसंडी मारली आहे. भाजपने काँग्रेसला मागे टाकत आपली आघाडी कायम ठेवली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला पाहिजे तसे यश मिळाले नाही, तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस (शप) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला खातेही उघडता आले नाही.

नागपूर महापालिकेच्या ३८ प्रभागातील १५१ जागांसाठी काल मतदान घेण्यात आले. मतदानाची टक्केवारी लक्षात घेता सर्वच पक्षांमध्ये धाकधुक होती. महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी आवश्यक असा आकडा कोण गाठणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. महापालिकेमध्ये २४ लाख मतुर ९९३ मतदारांचे भवितव्य ठरविणार होते. या निवडणुकीत भाजपसह, काँग्रेस, शिंदेसेना, राष्ट्रवादी अजित पवार गट, शरद पवार गट, उबाठा, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी, मनसे यांच्यासह मुस्लिम लिगचे उमेदवार देखील निवडणूक रिंगणात होते. त्यामुळे ३८ प्रभागात कोण गुलाल उधळणार याची उत्सुकता सर्वांना लागली होती.

शुक्रवारी सकाळी दहा वाजेपासून मनपाच्या दहा झोनमध्ये मतमोजणीला सुरूवात झाली. सुरुवातीला टपाली मते मोजण्यात आली. त्यानंतर ईव्हीएम मशीनमधील मतमोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीपासूनच भाजपने बहुतांश प्रभागात आघाडी घेतली होती. टपाली मतांमध्ये ११ जागांवर भाजप पुढे होती. मागील काही वर्षात नागपुरात काँग्रेसने आपली ताकद वाढविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, सुरूवातीच्या कलांमध्ये काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नाही. भाजपच्या मिशन १२२ समोर काँग्रेसची पिछेहाट पहायला मिळाली. दुसरीकडे शरद पवारांच्या राष्ट्रवादीला आणि मनसेला खातेही उघडता आले नाही.

नागपूर महापालिकेची निवडणूक ही भाजपसाठी प्रतिष्ठेची लढाई होती. गेल्या १५ वर्षांपासून महापालिकेवर भाजपची सत्ता आहे. यंदाही विकास कामांच्या मुद्दावर भाजपने मतदारांना मते मागितली. या मुद्दांना दाद देत सुरुवातीपासूनच मतदारांनी भाजपवर विश्वास दाखविल्याचे दिसून आले. निवडणुकीचा पहिला कल प्रभाग ३५ चा आला. त्यात काँग्रेसचे उमेदवार तीन जागी, तर भाजपचा उमेदवार एका जागी आघाडीवर होता. त्यानंतर काही प्रभागात भाजपने आणि काँग्रेसने मुसंडी मारली. काही प्रभागात भाजप चारही जागांवर आघाडीवर होते. फेऱ्यानुसार जागा कमी जास्त होत असल्याचे दिसून येत होते. प्रभाग ६ मध्ये सुरुवातीला भाजप आघाडीवर होती. त्यानंतर मुस्लिम लिगच्या उमेदवारांनी मुसंडी मारत शेवटपर्यंत आपली आघाडी कायम ठेवली. पहिला निकाल प्रभाग २८ चा जाहीर करण्यात आला. या मतदारसंघातून शिवसेना ठाकरे गटाचे किशोर कुमेरिया, मंगला गवरे आणि भाजपचे पिंटू झलके व नीता ठाकरे विजयी घोषित करण्यात आले. फेऱ्यानुसार सर्वच पक्षाचे निकाल मागेपुढे होत होते. परंतु, बहुतांश जागी भाजपचे उमेदवार आघाडीवर होते.



### ईव्हीएम मशीन बंद

प्रभाग २३ वर्धमाननगर परिसरात मतमोजणी होत असताना टेबल क्र. १० वरील ईव्हीएम मशीन अचानक बंद पडले. त्यामुळे सर्वच पक्षाच्या उमेदवार आणि कार्यकर्त्यांनी गोंधळ घालायला सुरूवात केली. त्यामुळे या टेबलवरील मतमोजणी काही काळासाठी बंद करण्यात आली. मतमोजणी बंद केल्याने उमेदवारांच्या प्रतिनिधींनी गोंधळ घालत घोषणाबाजी केली. मशीनची दुरूस्ती केल्यानंतर पुन्हा मतमोजणी करण्यात आली.

### कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

शुक्रवारी सकाळपासूनच सर्वच पक्षाच्या प्रतिनिधींनी आणि कार्यकत्यांनी झोन कार्यालयासमोर गर्दी केली होती. जसजसे कल बदलत होते तसतसा कार्यकर्त्याचा उत्साह वाढत होता. ज्या उमेदवाराने जास्त मतांची आघाडी घेतली त्या उमेदवाराचे कार्यकर्ते जल्लोश करीत होते. उमेदवाराने पाच ते सहा हजाराची आघाडी घेतल्यास कार्यकर्ते विजयाचा गुलाल उधळत होते. सर्वच झोन कार्यालयासमोर हे चित्र दिसून येत होते.

## शिवानी दाणी यांना सर्वाधिक मते

**नागपूर, दि. १६**



भाजपने लक्ष्मीनगर झोनमधील चारपैकी तीन झोनमधील सर्वच्या सर्व जागांवर विजय मिळवला आहे. तर प्रभाग क्रमांक ३६ मधून भाजपच्या महापौरपदाच्या दावेदार शिवानी दाणी यांनी सर्वाधिक मते मिळवून दणदणीत विजयी पतका फडकवली आहे.

सकाळी १० वाजता लक्ष्मी झोनमधील सर्व चारही प्रभागात एकाचवेळी मतमोजणी सुरुवात झाली. पहिल्या फेरीत प्रभाग क्रमांक १६,३६ आणि ३७ मधील भाजपचे सर्व उमेदवार आघाडीवर होते. तर प्रभाग क्रमांक ३८ मध्ये दोन काँग्रेसचे आणि एक भाजपचा उमेदवार पुढे होता. हाच कल पुढेही सुरू राहीला आणि अंतिम निकालही त्यांचा पद्धतीने आला. प्रभाग क्रमांक ३८ मध्ये मतमोजणीच्या १२ फेऱ्या, प्रभाग ३६ मध्ये १९ फेऱ्या, प्रभाग १६ मध्ये १८ फेऱ्या आणि प्रभाग ३७ मध्ये १६ फेऱ्या झाल्या.

## भाजपचा विजयी विकास आणि विश्वासाचा कौल : बावनकुळे



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १६**

महापालिका निवडणुकीचा कौल हा केवळ निवडणुकीचा निकाल नसून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुतीच्या नेतृत्वावर व्यक्त केलेला विश्वास आहे असे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

राज्यात सर्वत्र भाजपला मोठ्या प्रमाणात जनतेने कौल दिल्यानंतर नागपुरात ते पत्रकारांशी बोलत होते. मुंबईत भाजप-शिंदेसेना महायुती आघाडीवर आहे. तब्बल २५ वर्षानंतर मुंबईवरील ठाकरे गटाची सत्ता संपुष्टात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृतत सरकारच राज्याचा विकास करू शकते अशी जनतेची भावना आहे. त्यामुळे भाजप-शिवसेना महायुती दोन तृतियांश बहुमतासह सत्तेवर येणार आहे. नागपुरात देखील मतदारांनी विकासाला प्राधान्य दिल्याचे बावनकुळे यांनी पत्रकारांना सांगितले.

देवेंद्र फडणवीस आणि नितीन गडकरी यांच्या विकासात्मक धोरणांवर विश्वास व्यक्त करीत नागपूरच्या मतदारांनी विकसित नागपूरला मतदान केले आहे. राज्यात एकूण नगरसेवकांपैकी सुमारे ५१ टक्के नगरसेवक भाजप व महायुतीचे असतील असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या ठाकरे बंधूवर टीका करताना बावनकुळे म्हणाले, जेथे त्यांच्या उमेदवारांचा विजय होतो तेथे ईव्हीएम मशीन चांगली आहे. जेथे भाजपचे उमेदवार जिंकतात तेथे मशीनवर संशय व्यक्त करण्यात येतो. हे जनतेला पटले नाही. जनतेला विकास महत्वाचा आहे. यानंतर राज्यात केवळ विकासाच राजकारण होईल असेही त्यांनी पत्रकारांना सांगितले.

## विकास हाच भाजपचा अजेंडा : फडणवीस

### नगरसेवकांना जबाबदारीने वागण्याचा सल्ला

**मुंबई, दि. १६**

राज्यातील महापालिका निवडणूक आपण ज्या मुद्द्यावर लढलो, त्याला जनतेने प्रतिसाद दिला. त्यामुळे यापुढे आपला अजेंडा विकास हाच असणार आहे. विकासाच्या माध्यमातून शहरात राहणाऱ्या गरीब, मध्यमवर्गीयाच्या जीवनात मोठे परिवर्तन आणण्यासाठी आम्ही हा विजय समर्पित करत आहोत, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केली.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीत भाजपने मोठे यश मिळवले. नरिमन पॉईंट येथील भाजपच्या प्रदेश कार्यालयात या विजयाचा फडणवीस यांच्या उपस्थितीत जल्लोष करण्यात आल्या. त्यावेळी बोलताना फडणवीस यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मरण करताना महापालिका निवडणुकीतील विजय कार्यकर्त्यांना समर्पित केला. तसेच निवडून आलेल्या भाजपच्या नगरसेवकांना



जबाबदारीने वागण्याचा सल्ला दिला. भाजपवरील विश्वासामुळे तुम्ही निवडून आला आहात. त्यामुळे या विश्वासाला तडा जाणार नाही अशाप्रकारच्या वर्तनाची अपेक्षा फडणवीस यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांकडून व्यक्त केली.

महापालिका निवडणुकीत भाजप आणि आणि महायुतीला महाविजय मिळाला आहे. या विजयाने आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडलेले आहेत. मुंबईतील कल लक्षात घेता आहेत मुंबई महापालिकेवरही महायुतीचा झेंडा फडकेल. आजच्या विक्रमी जानदेशाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की लोकांना विकास आणि प्रामाणिकता हवी आहे. याशिवाय महाराष्ट्राचा विश्वास अजूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आहे , हे निकालाने स्पष्ट केले. बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद हा आपल्या महायुतीच्याच पाठीशी होंता म्हणूनच हा विजय आपल्याला मिळाला, असे फडणवीस म्हणाले.

**हिंदुत्व हा आमचा आत्मा**

हिंदुत्व हा आमचा कार्याचा आणि विचारांचा आत्मा आहे. आम्ही हिंदुत्ववादी आहोत, याबद्दल आम्हाला अभिमान आहे. खऱ्या अर्थाने हिंदुत्व आणि विकास यांना वेगळे करता येणार नाही. आम्ही संकुचित हिंदुत्व मानणारे नाही. आम्ही व्यापक हिंदुत्व मानणारे लोक आहोत. आमच्या हिंदुत्वामध्ये सगळ्यांचा समावेश आहे. जो जो भारताच्या संस्कृतीला आपली संस्कृती समजतो, भारतीय प्राचीन जीवन पद्धतीला जो आपली जीवन पद्धती मानतो, त्या सगळ्या लोकांना आम्ही आमच्या हिंदुत्वाच्या व्याख्येमध्ये घेतले आहे.

## गडकरी वाड्यासमोर भाजपचा जल्लोश



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १६**

भाजपने एकहाती सत्ता मिळविल्यानंतर भाजपचे नेते आणि कार्यकर्त्यांनी महाल येथील केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या गडकरी वाड्यासमोर जोरदार जल्लोश केला. या आनंदोत्सवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यकर्त्यांनी फटाके फोडत आणि गुलाल उधळत जल्लोश केला. त्याचप्रमाणे कार्यकर्ते ऐकमेकांना मिठाईचे वाटप करीत होते. यावेळी कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत जोरदार घोषणाबाजी करीत परिसर दणाणून सोडला. यावेळी भाजपा नेते अजय संचेती, जयप्रकाश गुप्ता आदी उपस्थित होते.

## तालुकास्तरीय लोकशाही दिन १९ जानेवारीला

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १६**

तालुकास्तरीय लोकशाही दिन १९ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ यावेळेत तहसील कार्यालय, नागपूर ( ग्रामीण) येथे आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी तालुक्यातील सर्व विभागाचे विभागप्रमुख उपस्थित राहणार आहेत. तालुक्यातील नागरिकांनी आपल्या समस्या/तक्रारी लेखी स्वरुपात लोकशाही दिनात सादर कराव्यात, असे तहसीलदार नागपूर (ग्रामीण) यांनी कळविले आहे.

## उत्तर महाराष्ट्रात महाजनांचा राजकीय मास्टरस्ट्रोक!

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १६**

उत्तर महाराष्ट्रातील राजकारणात एकच नाव गाजतंय गिरीश महाजन. मालेगावचा अपवाद वगळता नाशिक, धुळे आणि जळगाव या तिन्ही महापालिकांवर भारतीय जनता पक्षचा भगवा फडकला आणि तोही स्वबळावर! महायुतीला दूर ठेवत, सावध-चतुर आणि आक्रमक डावपेच राबवत महाजनांनी राजकीय पटावर किंगमेकरची मोहोर उमटवली.

महायुती केल्यास जागा वाटपात भाजपचे हात बांधले गेले असते. हीच कडी ओळखून महाजनांनी युतीला नकार दिला. निकालांनी सिद्ध केलं हा निर्णय धाडसी नव्हे, तर दूरदृष्टीचा होता. शिंदे गट सत्तेपासून दूर राहिला, तर भाजपने संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात वर्चस्व प्रस्थापित केलं.

जळगाव महापालिका ही महाजनांच्या नेतृत्वाची कसोटी. येथे महायुती असूनही भाजपने ४६ पैकी ४६ उमेदवार विजयी करून इतिहास घडवला. ७५ सदस्यांच्या सभागृहात भाजप स्वबळावर सत्तेत विरोधक हादरले, समर्थक भारावले!

दैनिक
युवाराष्ट्र दर्शन
बेरोजगार युवकांचा मार्गदाता
यवतमाळ
३
शनिवार, १७ जानेवारी २०२६
जिल्हा

## 'अरुणोदय' अभियानाचा नांझा येथून जिल्हास्तरीय शुभारंभ

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ

जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमिया या आनुवंशिक आजाराच्या उच्चाटनासाठी व जनजागृतीसाठी आरोग्य विभागातर्फे 'अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ आयुष्मान आरोग्य मंदिर, नांझा ता. कळंब येथे उत्साहात पार पडला. अभियानाचे उद्घाटन नांझा ग्रामपंचायतीच्या सरपंच रेखाताई हसतबांधे, यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले होते. यावेळी डॉ. क्रांतीकुमार नावंदीकर, डॉ. नितेश उपाध्याय, डॉ. मधुकर मडावी, डॉ. रामटेके यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शन करताना डॉ. सुभाष ढोले यांनी सिकलसेल हा आनुवंशिक आजार असून वेळेवर तपासणी व उपचार केल्यास त्यावर नियंत्रण शक्य असल्याचे सांगितले.

## नगरसेवकांचा इंडस मोबाईल कंपनीच्या टॉवर उभारणीला दणका



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १६ जानेवारी

सावित्रीबाई फुले शाळा परिसरातील बेले-ले-आऊट, सिताराम नगरीलगत इंडस मोबाईल कंपनीच्या मोबाईल टॉवरच्या उभारणीचे काम काही महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आले होते. मात्र या टॉवरला स्थानिक रहिवाशांचा तीव्र विरोध असून याबाबत संबंधित यंत्रणांकडे तक्रारीही दाखल करण्यात आल्या होत्या. असे असतांनाही गेल्या आठवड्यात सदर कंपनीने पुन्हा एकदा काम सुरू केले. काम सुरू करतांना इंडस मोबाईल कंपनीने स्थानिक नागरिकांच्या विरोधाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत पोलीस प्रशासनाच्या सुरक्षेचा आधार घेऊन दबाव तंत्र वापरल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. २९ चे नवनिर्वाचित नगरसेवक बिपीन चौधरी व नगरसेविका सौ. सोनालीताई मडावी यांनी दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच संबंधित इंडस मोबाईल कंपनीस पत्राद्वारे सदर काम तात्काळ बंद करण्याबाबत सूचित केले होते. मात्र त्यानंतरही कंपनीच्या मुजोर कंत्राटदाराने पोलीस संरक्षण (Police Protection) घेऊन टॉवरचे काम सुरूच ठेवले. आज दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.३० वाजता स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक बिपीन चौधरी यांना फोनद्वारे टॉवरचे काम सुरू असल्याची माहिती दिली. माहिती मिळताच कोणताही विलंब न करता त्यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी टॉवर उभारणीसाठी खोदण्यात आलेला सुमारे २० फूट खोल खड्डा व गज बांधणीचे काम थांबवून थेट खड्डा बुजविण्यात आला व सदर ठिकाणी मोबाईल टॉवरचे काम पूर्णपणे बंद पाडण्यात आले. तसेच स्थानिक नागरिकांना इंडस मोबाईल कंपनीच्या टॉवरची परवानगी रद्द करण्यासाठी प्रशासनाकडे ठोस पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन नगरसेवक व नगरसेविकांनी दिले. या ठाम भूमिकेमुळे स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक बिपीन चौधरी व नगरसेविका सौ. सोनालीताई मडावी यांचे आभार मानले.

## संक्षिप्त

### वसतिगृह सुरू करण्यासाठी खाजगी इमारतींचे प्रस्ताव आमंत्रित

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करण्याबाबत कार्यपद्धती व नियमावली शासनाने निश्चित केली आहे. शहरात १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांचे वसतिगृह सुरू करण्याचा प्रस्ताव असून, यासाठी खाजगी इमारत भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहे.

### तीन दिवसीय चाचा नेहरू बालमहोत्सवाचे आयोजन

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

अनाथ, निराधार, निराश्रित तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी चाचा नेहरू बालमहोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले आहे. हा बालमहोत्सव दि. १९ जानेवारी ते २१ जानेवारी या कालावधीत शासकीय मुलांचे बालगृह व निरीक्षणगृह तसेच पोलिस कवायत मैदान येथे आयोजित करण्यात येणार आहे. सदर बालमहोत्सवाचे उद्घाटन दि. १९ जानेवारी रोजी शासकीय मुलांचे बालगृह व निरीक्षणगृह, यवतमाळ येथे होणार असून, यावेळी जिल्हाधिकारी, यवतमाळ, विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, अमरावती विभाग, तसेच बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य आणि बाल न्याय मंडळ, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# पालकमंत्री यांचे हस्ते उद्घाटन

## तीर्थ दर्शन यात्रेला दाखविली हिरवी झेंडी : आमदार बाळासाहेब मांगुळकर यांची उपस्थिती

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १६ जानेवारी

पालकमंत्री संजय राठोड व आ.बाळासाहेब मांगूळकर यांचे हस्ते मोटार सायकल बाराखांडी तीर्थ दर्शन यात्रेचे हिरवी झेंडी दाखवून उद्घाटन केले.



यावेळी महानुभाव भक्त परिषद यवतमाळ अंतर्गत राष्ट्रीय नंदगवळी समाज संघटना, नंद गवळी समाज फाउंडेशन रजी. न.७०५ द्वारा आयोजीत मोटार सायकल बाराखांडी तीर्थ दर्शन यात्रेचे आयोजन १६ जानेवारी २०२६ ला दुपारी 12 वाजता श्री कृष्ण फुलारी मंदिर शिंदे प्लॉट यवतमाळ येथून करण्यात आले येथून जामवाडी, जांभोरा, दिग्रस, लाख पुसद, येथे विश्राम १७ जानेवारी शिळोणा, हर्षी, मुळावा, पार्डी,दगडधानोरा, मुळावा येथे पिडाहरण पंचकृष्ण कॉलेज अजय झरकर यांचेकडे तेथून गगनमाळ, अंबाडी, आबासाहेब बाबासाहेब, बाराखांडी, प. पुं. त. फुलाअक्का संन्यासी श्रीकृष्ण मंदिर उमरखेड देवपूजा प्रसाद वंदन, चुरमुरा खांड येथे विश्राम दत्तराजबाबा संन्यासी यांचे कडे करण्यात आली आहे.

१८ जानेवारी २६ ला विडुळ, कृष्णापुर, ढाणकी, मन्याळी, किनवट मार्गे दहेली (खांड)ढानकि येथे श्री कृष्णानंद दादाजी अमृते यांचेकडे उदक व श्री शहागडकर बाबा निवघा यांचे कडे पिडाहरण,तेथून उमरी (कापेश्वर) सदोबा- सावळी मार्गे श्री दत्तमंदिर आर्णी व जवळा (खांड) त. सुनंदाआई मेहकरकर अतुल गवळी यवतमाळ, सायंकाळी ६ वाजता प्रायश्चित विधी समारोप महाप्रसाद शुभचिंतन पपूपम आचार्यप्रवर श्री लाडबाबा हरसूल, पपूपम श्री रेवेराजबाबा शास्त्री यवतमाळ, पपूपम आचार्यप्रवर श्रीसंन्यासीबाबा उमरखेड, पपूपम आचार्य त. प्रेमाला अक्काजी पंजाबी जामवाडी, पपुत.फुलाअक्का संन्यासी उमरखेड, पुमश्री अंतराजदादाजी अंकुळनेकर, आबासाहेब बाबासाहेब, या मोटार सायकल बाराखांडी यात्रेचे मार्गदर्शक पपूपम धनंजयदादा पंजाबी, पपूपम. गोविंदराज बाबा रिद्धपूरकर पपूपम शहापूरकरबाबा येरला, पपूई. श्रीकांतमुनी दादा पंजाबी नागपूर, पपू ई. माधव मुनी दादा अमृते यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली प पू प म. गोविंदराज बाबा रिद्धपूरकर यांनी हे नियोजन केले.

## स्वामी विवेकानंद स्मारक अनावरण सोहळ्यात युवकांना प्रेरणादायी संदेश

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

येथे आयोजित स्वामी विवेकानंद स्मारकाच्या भव्य अनावरण सोहळ्या प्रसंगी केंद्र सरकारच्या युवा व खेल मंत्रालयाचे संचालक डॉ. संदीप राठोड यांनी उपस्थित युवक व नागरिकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. स्वामी विवेकानंदांचे विचार आजही युवकांसाठी तितकेच मार्गदर्शक व प्रेरणादायी असून, "उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त केल्याशिवाय स्वस्थ बसू नका" हा संदेश प्रत्येक युवकाने आपल्या जीवनात अंगीकारावा, असे त्यांनी यावेळी आवाहन केले. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विकास मीना यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच परमपूजनीय स्वामी विष्णूपादानंद



महाराज, परमपूजनीय स्वामी ओंकारेशानंद महाराज, परमपूजनीय स्वामी चेतनात्मानंद महाराज यांच्या पावन उपस्थितीमुळे सोहळ्याचे आध्यात्मिक वातावरण अधिकच उंचावले. डॉ. संदीप राठोड यांनी युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वामी विवेकानंदांचे विचार आत्मविश्वास, राष्ट्रभक्ती, चारित्र्य, संयम आणि सेवाभाव यावर आधारित आहेत. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शिक्षण नव्हे तर शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक सबलता, सकारात्मक दृष्टिकोन आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. स्वामी विवेकानंदांचे विचार जीवनात उतरविल्यास युवक निश्चितच यशस्वी होतील व देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी डॉ. टी. सी. राठोड, एल. एच. पवार, तसेच धुळे येथील वैद्य प्रवीण जोशी यांचीही उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत युवकांनी मूल्याधिष्ठित व राष्ट्रसेवेसाठी समर्पित जीवन जगावे, असे आवाहन केले. या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी देवी सामका महिला बहुउद्देशीय संस्थेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच यवतमाळ शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. स्वामी विवेकानंद स्मारक हे केवळ एक स्मारक नसून, युवकांसाठी प्रेरणाकेंद्र व मूल्यसंस्कारांचे शक्तिस्थान ठरेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

## नोकरीचे आमिष देऊन आठ लाखांची फसवणूक

### पोस्टमास्टर पदाचे आमिष; आरोपी अटक

•युवाराष्ट्र दर्शन युवाराष्ट्र दर्शन/ दारव्हा, ता.१६

पोस्टमास्टरची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून आठ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फिर्यादी सुषमा क्रांतिकुमार पांडे (वय ३६, रा. घाटंजी) यांनी सोमवारी (दि. १२) येथील पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव प्रज्ञेश रुपेश पाटील (वय



३२, रा. अंबिकानगर, दारव्हा), दत्तात्रय गोपाल ( वय ५०)रा. मुंबई असे आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुषमा पांडे यांचा मानलेला भाऊ नयन रूपेश निबुधे (रा. घाटंजी) याला पोस्टमास्टरची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून आरोपीने आठ लाख रुपये घेतले. मात्र, नोकरी न लावता आरोपीने फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी आरोपीला तात्काळ अटक करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. मोबाईल लोकेशन व मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कारंजा लाड (जि. वाशीम) येथून पोलिस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे व पोलिस पथकाने बुधवारी (दि. १४) पहाटे १ वाजता आरोपीला अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## आरोग्य ठोंबरे, बांधकाम केळापूरे, नियोजन धावतोडे, शिक्षण भवरे, महिला व बालकल्याण सावळे यांची सभापती पदी वर्णी



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १६ जानेवारी

यवतमाळ नगर परिषदेत शुक्रवारी (ता. १६) सर्व विषय समिती सभापती आणि स्थायी समितीची निवड प्रक्रिया उत्साहात पार पडली. पिठासीन अधिकारी गोपाल देशपांडे यांनी सभापती आणि त्यांच्या खात्यांची घोषणा केली. विशेष म्हणजे, सर्व समित्यांच्या अध्यक्षपदी महिलांची वर्णी लागल्याने नगर परिषदेत खऱ्या अर्थाने 'महिला राज' सुरू झाले आहे. सर्व सभापती आणि स्थायी समितीच्या निवडीनंतर नगर परिषदेच्या परिसरात ढोल, ताशे, नगारे, वाजवत गुलाल उधळून जल्लोष साजरा करण्यात आला.

सुरुवातीलाच नगर परिषदेमध्ये अध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी पदभार स्वीकारल्यानंतर उपाध्यक्षांची निवड करण्यात आली होती. त्यावेळी विलास उर्फ दत्ता वसंतराव कुलकर्णी उपाध्यक्ष पद दिल्यानंतर आज त्यांच्याकडे पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण समितीचा कार्यभार सोपविण्यात आला आहे, तर नीता भास्करराव केळापुरे सभापती सार्वजनिक बांधकाम समिती, प्रियंका चेतन भवरे सभापती शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती, लता रमेश ठोंबरे सभापती स्वच्छता वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती, रिता गजानन धावतोडे सभापती नियोजन व विकास समिती, शोभा उद्धवराव साबळे सभापती महिला व बालकल्याण समिती यांची निवड करण्यात आली महिला व बालकल्याण उपसभापती पदी सोनाली तिडके यांची तर स्थायी समितीमध्ये रेखा अशोक कोठेकर, साधना विनोद काळे, विशाल सुधाकर पावडे यांची सदस्य म्हणून स्थायी समितीवर निवड करण्यात आली आहे.

## जुगार अड्ड्यावर छापा; पाच अटक, तीन पसार

### १ लाख २८ हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दारव्हा, दि. १६ जानेवारी

बोदेगाव येथील गावातील चौकात खुलेआम जुगार खेळला जात असल्याबाबत ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी मोठी कारवाई करत जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत पाच आरोपींना अटक करण्यात आली असून तीन आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाले आहेत. ही कारवाई रात्री (दि.१५)ला सुमारे १२ वाजताच्या सुमारास



पोलिस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक गावंडे, जमादार विष्णू चव्हाण युवराज चव्हाण तसेच इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे छापा टाकला. कारवाई दरम्यान घटनास्थळावरून तीन मोटारसायकली, मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकूण एक लाख अठ्ठावीस हजार तीनशे दहा रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात एकूण आठ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी पाच जणांना अटक करण्यात आली आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथकाकडून पुढील तपास सुरू आहे. बातमी लिहेपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## महिला लोकशाही दिन 19 जानेवारी रोजी

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

महिलांच्या तक्रार निवारणासाठी जिल्हा महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित केला जातो. या महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार दि.19 जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. तालुकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित केला जातो. महिलांनी प्रथम या लोकशाही दिनात तक्रार दाखल करावी. सदर तक्रारीवर योग्य कारवाई झाली नसल्यास जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तालुकास्तरीय लोकशाही दिनात केलेले अर्ज व टोकन क्रमांकासह तक्रार सादर करावे. न्यायप्रविष्ट प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी आणि वैयक्तिक तक्रार किंवा निवेदने स्विकारले जाणार नाहीत, याची महिलांनी नोंद घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

# सहाव्या महावीर प्रीमियर लीग सीझन ६ चे थाटात उद्घाटन

## सकल जैन समाजातील युवकांनी संघटित होऊन समाजहितासाठी कार्य करावे – किशोर बाबू दर्डा

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १६ जानेवारी

श्री महावीर युवक मंडळ, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महावीर प्रीमियर लीग सीझन ६ या भव्य क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तळेगाव भारी ग्राउंड, यवतमाळ येथे अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाले. या स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, लोकमत समूहाचे जिल्हाप्रमुख तथा सकल जैन समाजाचे




संयोजक किशोर बाबू दर्डा, जैन सेवा समितीचे अध्यक्ष महावीर भन्साली, यवतमाळ जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संजय सिसोदिया, उद्योजक अरुणभाई खारा, संदीप तातेड, डॉ. रमेश खिवसरा, महिला समितीच्या सौ. चंदा कोटेचा, महावीर नवयुवक मंडळाचे अध्यक्ष समर्पण गांधी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

युवकांनी संघटित व्हावे – किशोर बाबू दर्डा

उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना किशोर बाबू दर्डा म्हणाले की, सकल जैन समाजातील युवकांनी एकजूट होऊन एक सशक्त संघटना उभारावी व त्या माध्यमातून समाजहिताचे कार्य करावे. जिल्हास्तरावर युवकांचे अधिवेशन आयोजित करून समाजाच्या उन्नतीसाठी युवा पिढीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. त्यांनी सर्व खेळाडूंना स्पर्धेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. आयोजकांचे मुक्तकंठाने कौतुक प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी या स्पर्धेचे भरभरून कौतुक केले. समाजातील युवकांसाठी अशा प्रकारचे क्रीडा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. बलाढ्य संघांचा सहभाग या स्पर्धेत रॉयल किंग्स, लोढा लॉयन्स, आर.के. चॅलेंजर्स, गुरुदेव अवेंजर्स, परंपरा जेम्स, यश इन्व्हेस्टमेंट आणि जम्मू हे बलाढ्य संघ सहभागी झाले आहेत. प्रत्येक सामना चुरशीचा ठरणार असून क्रिकेटप्रेमींसाठी ही स्पर्धा पर्वणी ठरणार आहे. आकर्षक बक्षिसांची रेलचेल विजेत्या संघाला विनादेवी दर्डा स्कूल यांच्या वतीने प्रथम पुरस्कार, तर द्वितीय पुरस्कार जैन सेवा समिती, यवतमाळ यांच्या वतीने देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक सामन्यासाठी मॅन ऑफ द मॅच, संपूर्ण स्पर्धेसाठी बेस्ट बॅट्समन, बेस्ट बॉलर आणि मॅन ऑफ द सिरीज असे आकर्षक पुरस्कार ठेवण्यात आले आहेत. मोठ्या संख्येने मान्यवरांची उपस्थिती उद्घाटनप्रसंगी श्याम भन्साली, विजय लोढा, प्रसन्न सुराणा, प्रमोद तातेड, कमलकिशोर बंम्ब, राजेंद्र गांधी, विजयकुमार बुंदेला, उमेश बैद आशिष बोरा, नगरसेवक पंकज ननवाणी, पवन बोथरा, राजेंद्र गेलडा, सुनील भरूट, कस्तुर सेठीया यांच्यासह सकल जैन समाजातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-3 कावि/4/2026
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 06/01/2026

*** जाहीरनामा ***

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार इबादुल्ला खान बिस्मिल्ला खान रा. ढाणकी.ता. उमरखेड जि.यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा मुलगा नामे अलतमश खान जन्म दि-01/01/2011 रोजी मौजा ढाणकी येथे झाला आहे.अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक 28.01.2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप /हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

युवाराष्ट्र दर्शन
७
वर्धा जिल्हा
शनिवार, १७ जानेवारी २०२६

# आर्वीत उपाध्यक्षपदी जाजूंचा दणदणीत विजय

**७० वर्षांची परंपरा पुर्नजिवित  नगर पालिकेवर घराण्याचा थेट कब्जा**



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. १६**

आर्वी नगर पालिकेच्या राजकारणात गौरव राजेंद्रकुमार जाजू यांनी जबरदस्त एंट्री घेत उपाध्यक्ष पदावर कब्जा केला आहे. प्रभागातून सर्वाधिक मते खेचत जाजूंनी प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारली असून, हा विजय केवळ पदाचा नसून आर्वीच्या राजकीय सत्ताकारणातील निर्णायक वळण ठरला आहे.

मागील तब्बल २५ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात रस्त्यावर उतरून काम करणाऱ्या गौरव जाजू यांना मतदारांनी थेट सत्ता दिली. हा निकाल म्हणजे काम बोलते, बाकी सगळे फोल याचा स्पष्ट संदेश आहे. निवडणुकीत त्यांनी कोणतीही दिखाऊ घोषणा नाही, तर प्रत्यक्ष कामावर मत मागितले आणि जनतेनेही त्याला भरभरून प्रतिसाद दिला.

जाजू कुटुंबाचा नगरपालिकेतील इतिहासही तितकाच वजनदार आहे. त्यांचे एक आजोबा खूशालचंद जाजू १९३५ साली नगर परिषद अध्यक्ष होते, तर दुसरे आजोबा विठ्ठलदास जाजू १९५५ मध्ये उपाध्यक्ष होते. तब्बल ७० वर्षांनंतर गौरव जाजू या पदावर विराजमान होताच, नगर पालिकेतील घराणेशाही नव्या दमाने पुन्हा सक्रिय झाली आहे.

या विजयाने अनेक राजकीय समीकरणे कोलमडली आहेत. उपाध्यक्ष पदावर बसताच जाजूंनी स्पष्ट इशारा दिला आहे. काम नाही, तर माफी नाही. नगरपालिकेतील रखडलेले प्रश्न, भ्रष्टाचाराचे अड्डे आणि विकासाची कासवगती यांना आता थेट आव्हान मिळणार आहे.

### परिवर्तन मिशन स्कूलमध्ये प्रेरणादायी कार्यक्रम

**वर्धा, :** स्थानिक परिवर्तन मिशन स्कूल येथे राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन व दीप प्रज्वलन करुन करण्यात आली. त्याग, दूरदर्शीत्व व छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तीमत्व निर्माण करण्यात राजमाता जिजाऊ यांचे महत्वपूर्ण योगदान आहे, तसेच राजमाता जिजाऊ स्त्री सशक्तीकरणाच्या प्रतीक होत्या, असे प्रतिपादन परिवर्तन मिशन स्कूलचे मुख्याध्यापक आशिष मासोदकर यांनी मंचावरुन व्यक्त केले. उठा, जागे व्हा आणि लक्ष प्राप्त होत पर्यंत थांबू नका, या प्रेरणादायी विचारांच्या माध्यमातून स्वामी विवेकानंद यांचे जीवनावर आधारित विचार पियाली बॅनर्जी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात इयत्ता सातवीची अक्षरा थूल, इयत्ता आठवीची रिया लोखंडे व इयत्ता नववीची संस्कृती कळमकर या विद्यार्थ्यांनी आपले मनोगतातून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचारांचे आजच्या काळातील महत्व आपले मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन इयत्ता आठवीची सृष्टी यादव व इयत्ता सातवीची आराध्या तेलंग या विद्यार्थिनींनी पार पडले, आभार इयत्ता नववीची वंशिका लालवानी हिने पार पडले. यशस्वीतेसाठी शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# शासकीय कार्यालयातील दूरध्वनी यंत्रणा कोलमडली

**अधिकारी व कर्मचाऱ्यांशी साधता येईना संपर्क, नागरिकांना करावा लागतो अडचणीचा सामना**

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वडनेर, दि. १६**

मागील अनेक वर्षापासून सुरू झालेल्या मोबाईल यंत्रणेच्या वापरामुळे शासकीय कार्यालयातील भारत संचार निगमचे लॅंडलाईन दूरध्वनी क्रमांक बंद पडले आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयात संपर्कासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र विविध शासकीय कार्यालयात पहावयास मिळत आहे.

स्थानिक पोलीस स्टेशनसह रुग्णालयातील दूरध्वनी क्रमांक बंद अवस्थेत आहे. कृषी विभाग, तलाठी कार्यालय, बॅंक ऑफ इंडिया अश्या काही शासकीय कार्यालयाचे क्रमांक कायमच बंद पडलेले आहे. उपरोक्त कार्यालयाशी कामानिमित्त संपर्क करायचा झाल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या खाजगी नंबरवर संपर्क करावा लागतो, सदर अधिकाऱ्यास कार्यालयीन वेळेत संपर्क केल्यास एखादी वेळा ते उत्तर देतात मात्र कार्यालयीन वेळेनंतर त्यांच्याशी संपर्क साधने अडचणीचे ठरते याचा सर्वाधिक त्रास ग्रामीण भागातील नागरिकांना होतो. त्यामुळे शासकीय कार्यालयात एक स्वतंत्रपणे मोबाईल क्रमांक देण्यात येऊन त्याची माहिती सर्व नागरिकांपर्यंत पोहोचवावी अशी मागणी वडनेर सह परीसरातील नागरिकांनी केली आहे. सोबतच भारत संचार निगमने लॅंडलाईन पद्धतीच्या दूरध्वनी यंत्रणे बरोबरच स्वतंत्रपणे अस्तित्वात असलेले सध्याचे नंबर मोबाईल स्वरूपात दिल्यास नागरिकांना त्यावर संपर्क साधने सोयीचे तसेच सुलभ व सुरक्षित होऊ शकते याचाही विचार प्रशासनाने करणे गरजेचे असून या समस्येबाबत योग्य कारवाई करावी अशी मागणी वडनेरवाशियानी केली आहे.

**वडनेर पोलीस ठाण्यातील दूरध्वनी बंद**

वडनेर पोलीस ठाण्यात असलेला दूरध्वनी क्रमांक ०७१ ५३ २ ५५ ८३३ हा अनेक वर्षापासून बंद अवस्थेत आहे. स्थानिक पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या नागरिकांना व तक्रार कर्त्यांना या नंबरवर संपर्क केला असता तो नंबर कायमस्वरूपी बंद दाखवत आहे. संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करायचा झाल्यास त्यांच्या खाजगी मोबाईल नंबरवर संपर्क करावा लागतो या संदर्भात अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत, मात्र त्यावर उपाययोजना करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित विभागाने गांभीर्याने घेऊन बंद पडलेला दूरध्वनी क्रमांक सुरू करावा अशी मागणी जनतेतून होत आहे.

# हिंगणघाट रस्त्यावरील कवडघाट जवळील रस्त्याची तातडीने दुरुस्ती

## खासदार काळे यांच्या पत्राची दखल

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १६**

हिंगणघाट रस्त्यावरील कवडघाट जवळील रस्त्यात अनेक खड्डे पडल्याने हा रस्ता खराब झाला होता. या रस्त्यावरुन केवळ अर्धा किलोमीटरच्या रस्त्यावारुन मार्गक्रमण करणे कठीण होत होते. जवळपास १-१ फुटाचे खड्डे या रस्त्यावर पडले होते.

या संपूर्ण रस्त्यावरच खड्डे असलयाने खडयातूनचा वाहन धारकांना प्रवास करावा लागत होता. सदर बाब खासदार अमर काळे हे या भागात दौऱ्यावर असतांना



त्यांचे लक्षात आली त्यांनी वाहन धारकांना होणारा त्रास प्रत्यक्ष अनुभवला व तात्काळ राष्ट्रीय महामार्ग विभागाला पत्र दिले व फोन करुन हा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याचे निर्देश दिलेत. राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता यांनी खासदार अमर काळे यांचे पत्र व फोनवरील निर्देशाची तात्काळ दखल घेत रस्ता दुरुस्तीचे काम करण्यात आले. खासदार अमर काळे यांनी वेळीच नागरीकांच्या समस्यांची तत्परतेने दखल घेतल्याबद्दल अनेकांकडून खासदारांप्रती आभार व्यक्त करण्यात आले

व सर्वसामान्यांच्या सार्वजनिक प्रश्नाची तत्परतेने दखल घेत खासदार अमर काळे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळेच रस्त्याचे काम मार्गी लागले.

# कमी क्षेत्राची हस्तांतरणे, विभाजने अधिकार अभिलेखात नोंद होणार

**संबंधितांनी तहसिल कार्यालयात कागदपत्र सादर करण्याचे आवाहन**

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सेलू, दि. १६**

नोंदणीकृत दस्तऐवजांच्या आधारे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमीक्षेत्रांची झालेली हस्तांतरणे किंवा विभाजनांबाबतचे दस्तऐवज नोंदणीकृत झालेले असल्यास अशा हस्तांतरणाची अधिकार अभिलेखात नोंद करण्याबाबत शासनाच्या सूचना आहे. त्यामुळे जिल्ह्यात अशी हस्तांतरणे किंवा विभाजने झाली असल्यास संबंधितांनी अभिलेखात नोंद करण्यासाठी तहसिल कार्यालयात कागदपत्र सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारण) अध्यादेश २०२५ दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ रोजी किंवा त्यानंतर व १५ ऑक्टोबर २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी (दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते दि. १५ ऑक्टोबर २०२४) पर्यंत या कालावधीतील वेळोवेळी अधिसूचित केलेल्या स्थानिकक्षेत्रातील त्या-त्यावेळीठरवून दिलेल्या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्रांच्या जमिनींच्या कोणत्याही खऱ्याखुऱ्या अकृषिक वापराकरीता वापरली जात असेल किंवा वापरण्याचे उद्देशित असेल आणि जी जमीन महानगरपालिका नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्या हद्दीतील क्षेत्रातील जमिनी किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये अधिसूचित केलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रांतर्गत निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही अकृषिक वापराकरीता नेमून दिलेल्या क्षेत्रातील जमिनी (सेवाग्राम विकास आराखडा विशेष नियोजन प्राधिकरण) किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वयेकिंवात्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये तयार केलेल्या प्रारुप किवा अंतिम प्रादेशिक योजनेमध्येविनिर्दिष्ट केलेल्यानिवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही अकृषिक वापराकरीता नेमून दिलेल्या क्षेत्रातील आणि वृद्धी केंद्रामध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रातील जमिनी किंवा प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेत निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही अकृषिक वापराकरीता नेमून दिलेल्या आणि ज्यास एकीकृत विकास नियंत्रण व प्रचालन विनियम लागू होतात असा कोणत्याही गावाच्या, शहराच्या किंवा नगराच्या किंवा नगराच्या सीमांच्या परिघीय क्षेत्रातील जमिनी किंवा यामधील असल्यास अशा जमिनीबाबत कोणतेही अधिमूल्य न आकारता नियमाधीन करणेबाबत कार्यवाही करण्याच्या शासनाच्या सूचना प्राप्त आहे.

त्यानुसार जिल्ह्यातील नोंदणीकृत दस्तऐवजांच्या आधारे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्रांची झालेली हस्तांतरणे किंवा विभाजनांबाबतचे दस्तऐवज नोंदणीकृत झालेले असल्यास दि. ३ नोव्हेंबर २०२५ च्या अध्यादेशाच्या अनुषंगाने प्रथम प्राधान्याने अशा हस्तांतरणाची अधिकार अभिलेखात नोंद करण्यात येणार आहे. अशा नोंदींची शोधमोहीम तहसिल कार्यालयांमार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे असे दस्तऐवज नोंदणीकृत झाले असल्यास संबंधितांनी अभिलेख नोंदणीसाठी तहसिल कार्यालयात कागदपत्र सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

## संशयितरित्या लपून बसलेल्या तिघांवर कारवाई

**हिंगणघाट, :** तालुक्यातील हिंगणघाट वर्धा रोड वर असलेल्या धोत्रा येथील हॉटेलच्या मागे तीन इसम बसलेले होते, अल्लीपूर पोलीस गस्तीवर असताना तिघेही अस्तित्व लपवून संशयास्पदरित्या बसून दिसले, पोलिसांनी विचारपूस केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली, त्यावरुन पोलिसांनी विनायक गणपत देठे (वय ४७) अक्षय वनदेव जीवतोडे (वय ३१) राहणार सुकळी बर्फा, गौतम रामदासजी जुनघरे (वय ४५) रा. सिर्सी, ता. जि. नागपूर या तिघांना ताब्यात घेतले, या तिघांविरु( पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांना सूचना पत्रावर सोडण्यात आले, ही कारवाई अल्लीपूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार विजय घुले, पोलिस जमादार राहुल नव्हाते, पोलिस हवालदार अनुप नाईक यांनी केली.

# महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १६**

आज दिनांक १६ रोजी जिल्हाधिकारी वर्धा यांच्या मार्फत प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

नवी दिल्लीच्या राजधानीच्या सर्व सिमांवर तब्बल ३८६ दिवस चाललेल्या, विश्वविक्रमी ऐतिहासिक किसान आंदोलनाचा नेतृत्व केलेल्या संयुक्त किसान मोर्चा व अखिल भारतीय किसान यांचे राष्ट्रीय आवाहनावरुन, देशभर, राष्ट्रीय विरोध दिवस पाळण्यात येत आहेत, वर्धा जिल्हयात महाराष्ट्र राज्य किसान सभा या किसान आंदोलनाचे नेतृत्व करीत आहे.

(सी.२.५) टक्के या सूत्राच्या आधारे, किसान भावाला कायदेशीर हमी द्या, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफ करावे, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला २५ लाख रुपयाचे पॅकेज व सरकारी नोकरी द्या, शेतकरी विरोधी बिज विधेयक त्वरित मागे घ्या, शेतकरी विरोधी विज विधेयक २०२५ त्वतरत मागे घ्या, प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार करार आणि इतर मुक्त व्यापार करार रद्द करा, कापूस, सोयाबीन आणि तुरीसा`ी शासकीय खरेदीचे वचन पुर्ण करा, एक्सप्रेस वे, औद्योगिक शहरे व खाणकामासा`ी जबरदस्तीने भु-संपादन सुरू आहे, ते थांबवा, आदी मागण्यांचे निवेदन शासनास सादर करण्यात आले.

निवेदन देताना द्वारका इमडवार, गुणवंत डकरे, रामभाऊ दाभेकर, राजू तेलतुमडे, गजेंद्र सुरकार, मनोहर पचारे, महिला किसान अधिकारच्या प्रा. नूतन माळवी, गजानन पखाले, मारोतराव इमडवार, विनायक नन्नोरे आदी उपस्थित होते.

# नायलॉन मांजा बाळगणे भोवले ; आर्वीत दोघांवर गुन्हे दाखल

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १६**

नायलॉन मांजाचा वापर व त्याची विक्री तसेच साठवणूक करणाऱ्याविरुद्ध पोलीस विभागाने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे, याचाच एक भाग म्हणून गोपनीय माहितीच्या आधारे आर्वी पोलिसांनी नायलॉन मांजा बाळगणा-या दोघांवर कारवाई केली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशांना केंद्रस्थानी ठेवून पोलीस विभागाच्यावतीने नायलॉन मांजा बाळगणारे, विक्री करणारे तसेच त्याची साठवणूक करणा-यांवर धडक कारवाई केली जात आहे, आर्वी पोलिसांनी १२ रोजी रोहणा येथील पियुष विनायक टाकळे व विनायक गुलाब टाकळे यांच्यावर कारवाई केली.

या कारवाईत पोलिसांनी ५५ हजार ६०० रुपयांचा मुददेमाल जप्त केला, या दोन्ही आरोपीविरुद्ध आर्वी पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहितेच्या कलम २२३, २९२, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या सहकलम ५, १५ तसेच मोवाकाच्या सहकलम ३(१), १८१, १३०, १७७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मॉडेल हायस्कूल येथे शालेय स्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे उत्साही आयोजन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**कारंजा (घा.), दि. १६**

विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी आणि त्यांच्यातील अवांतर वाचनाची ओढ वाढवण्यासाठी स्थानिक मॉडेल हायस्कूल कारंजा येथे 'सामान्य ज्ञान' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत इयत्ता ५ वी ते १० वी च्या सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

**स्पर्धेचे स्वरूप**

ही स्पर्धा दोन गटांत विभागण्यात आली होती. प्राथमिक गटात (५ वी ते ७ वी) आणि माध्यमिक गटात (८ वी ते १० वी) स्पर्धा पार पडली. ही स्पर्धा ५० गुणांची होती.

६ डिसेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन ते ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दरम्यान तोंडी प्रश्नमंजुषा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना दररोज सामान्य ज्ञानाचे दोन प्रश्न विचारल्या गेले.

प्रश्नमंजुषा उपक्रम संपल्यानंतर सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये चालू घडामोडी, इतिहास, भूगोल, विज्ञान आणि क्रीडा क्षेत्रावर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता.

वर्ग ५ ते ७ या गटात प्रथम क्रमांक टिना तारकेश्वर पवार, द्वितीय क्रमांक लोचना दिनेश चरडे, तर तृतीय क्रमांक कु. मोहिनी हेमराज चोपडे, गायत्री राजेश घागरे, मनस्वी विलास पठाडे, पलक हंसराज बनगरे, खुशबू खेमचंद बोबडे या विद्यार्थ्यांचा असून प्रोत्साहनपर क्रमांक स्वरा रंजीत भुसारी व अर्णवी श्रीकृष्ण इंगळे यांचा आला आहे.

वर्ग ८ ते १० या गटात प्रथम क्रमांक श्रावणी प्रवीण भांगे, द्वितीय क्रमांक कु नेहा शत्रुघ्न किरणाके व वैभव चंपत खवशी यांचा असून तृतीय क्रमांक संगम टेक्शन बारंगे, गुणश्री किशोर डोंगरे, त्रियश सुरेशराव चोपडे, लावन्या राजकुमार दुर्गे, अनुष्का राजेश ढोले, करण कृष्णराव देशमुख, सोनल उत्तम शिंदे, अंकिता सतीश धारपुरे या विद्यार्थ्यांचा आला आहे.

सामान्य ज्ञान स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना कारंजा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी विणा धावडे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी पंचायत समिती शिक्षण विभागाचे केंद्रप्रमुख भुजाडे, रमधम, शाळेचे मुख्याध्यापक विनोद कहारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

'केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान पुरेसे नसून जगाशी स्पर्धा करण्यासाठी अष्टपैलू माहिती असणे आवश्यक आहे. अशा स्पर्धामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाव्यतिरिक्त माहिती मिळवण्याची एक नवी ऊर्जा पाहायला मिळाली असे शाळेचे शिक्षक विनोद चाफले यांनी म्हटले.

# शेतकऱ्याची शेतात विष प्राशन करून आत्महत्या

## आनंदवाडीत या गावात हळहळ व्यक्त

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**तळेगाव (शा. पंत), दि. १६**

तळेगाव शा. पंत पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या आनंदवाडी येथील रहिवासी सुभाषराव पांडुरंग पन्नासे (वय ६७) यांनी आर्थिक विवंचनेला कंटाळून शेतात विष प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना आज घडली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुभाषराव पन्नासे यांच्याकडे सुमारे दोन एकर कोरडवाहू शेती होती. गेल्या काही वर्षांपासून सततची नापिकी, अपुरा पाऊस आणि वाढता खर्च यामुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते. त्यातच त्यांनी बॅंकेत सोने तारण ठेवले होते तसेच त्यांच्यावर बॅंकेचे कर्जही होते. या कर्जाबाबत बॅंकेकडून वारंवार नोटिसा येत असल्याने ते सतत तणावात होते.

काही दिवसांपूर्वी त्यांच्या शेतातील गोठ्याला लागलेल्या



आगीत दहा म्हशी आणि दोन बैल जळून मृत्युमुखी पडले. या घटनेत त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. मात्र, या नुकसानीसाठी त्यांना कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसल्याचे सांगितले जाते. या साऱ्या कारणांमुळे त्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या.

आज दुपारी सुभाषराव यांनी घरच्यांना 'शेतात चक्कर मारून येतो' असे सांगून घराबाहेर पडले. त्यानंतर दुपारी दोन ते तीन वाजण्याच्या सुमारास त्यांनी शेतातील त्याच गोठ्यात विषप्राशन केले. काही वेळाने आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांना तातडीने आर्वी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

या घटनेनंतर तळेगाव शा. पंत पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे. सुभाषराव यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या अकस्मात मृत्यूमुळे आनंदवाडी व परिसरात शोककळा पसरली असून, शेतकरी वर्गातून तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

ही घटना पुन्हा एकदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी, कर्जबाजारीपणा आणि नैसर्गिक आपत्तींमुळेहोणारे नुकसान या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधणारी ठरली आहे.

